REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# "स्त्रीवादी समीक्षा : बदलते आयाम"

डॉ. पंडित जी. राठोड
सहयोगी प्राध्यापक , डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय , अमरावती.

## प्रास्ताविक :




जगभरातील मानवी समाजव्यवस्थेला प्रदीर्घ असा इतिहास आहे. प्रत्येक समुहाच्या, प्रदेशाच्या, कालखंडाच्या समकालीन घटनांचा विचार करताना जगातील बहुतांश समाज समुहामध्ये पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना गौण स्थान होते असेच दिसून येते. भारतीय समाजाच्या इतिहासातील प्राचीनतम कालखंडापासून स्त्रीचे स्थान दुय्यम असल्याचे आढळते असे असले तरी कालखंडपरत्वे स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, कौटुंबिक जीवनशैलीत व एकूणच मूल्यव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान व दर्जा यामध्ये बदल होत गेलेला दिसून येतो. वैदिक कालखंडाचा विचार केला तर स्पष्ट लक्षात येते की, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य होते. याची अनेकविध उदाहरणे ऐतिहासिक पुराव्याने सिध्द करता येतील. म्हणून हा काळ स्त्रियांच्या प्रगतीस अनुकूल काल होता, असे आपणास म्हणता येईल. मात्र उत्तर वैदिक काळापासून स्त्रियांच्या स्वातंत्र्याला ग्रहण लागलेले दिसते. स्त्री स्वातंत्र्यावर अधिक मर्यादा येऊन तिच्यावर अनेक बंधने लादली गेली. पारंपरिक विवाहपध्दतीला संस्कारांचे ताठर स्वरूप प्राप्त होऊन स्त्रियांच्या हक्कांचा संकोच झाला. त्याचबरोबरच युध्द, हिंस्त्रपशुंशी सामना करण्याच्या, शिकार करण्याच्या प्रक्रियेने पुरूष घराबाहेरील तर स्त्री ही घराच्या चार भिंतीतील कर्ते–करविते झाले. परिणामी स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित होऊन त्या अधोगतीस वाटचाल करू लागल्या. याशिवाय युध्दप्रसंगी व संकटकाळात पुरूषांनी संपत्तीप्रमाणेच स्त्रीचे संरक्षण केल्याने तिची गणना संपत्तीशी करण्याची प्रथा रूढ झाली. तद्नंतरच्या काळापासून स्त्रीही पुरूषांची दास, गुलाम झाली असे म्हणता येईल.

उत्तर वैदिक काळात स्त्रियांची तुलना मालमत्तेशी केल्याने संपत्तीचा अधिकार पुत्राकडे म्हणजेच पुरूषाकडे हस्तांतरीत झाला. वरदक्षिणा पध्दती, अग्रोपभोगाची पध्दती, कन्यादान पध्दतीने तर स्त्रियांच्या हस्तांतरणाला प्रारंभ झालेला दिसून येतो. यातून स्त्रियांचे आर्थिक परावलंबन वाढत गेले. समाजजीवनात घडणारे विपरित परिवर्तन स्त्रियांच्या प्रगतीस मारक आहे. याची जाणीव काही अंशी मध्ययुगात झालेली दिसते. म्हणून काही खास प्रयत्न करण्यात आलेले आहे. अशा काही पाऊलखुणा इतिहासात सापडतात. पुढे मात्र ब्रिटिशांच्या उदारमतवादी राजवटीत स्त्रीसुधारणेला प्रगतीला मोठा अवकाश निर्माण झाला व विशेष प्रयत्नही झालेली आहेत, असे आपणास म्हणता येईल.

## स्त्रीवादाची व्याख्या :

'स्त्रीवाद' या विचारप्रणालीची निश्चित अशी संज्ञा किंवा मूलभूत पार्श्वभूमी नसल्यामुळे स्त्रीवादाची व्याख्या स्थळानुरूप, काळानुरूप बदलत असल्याचे दिसून येते. म्हणूनच स्त्रीवादी अभ्यासक, कार्यकर्त्या यांनी केलेल्या व्याख्येमध्ये वैविध्य दिसून येते ते पुढीलप्रमाणे–

(1) डॉ. शोभा पाटील – ''समाजकारण अर्थकारण, राजकारण, कला व वाङ्मय व्यवहार या सर्व क्षेत्रांत स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान नाकारून, माणूसपणाचा क्षमताधिष्ठित हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय.''[1]

(2) मंगला वरखेडे – ''पुरूषाला समाजरचनेत जसे एक अर्थपूर्ण स्थान आहे, तसे स्त्रियालाही प्राप्त व्हावे यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत संघर्षशील राहणारी 'स्त्रीवाद' ही एक विचारप्रणाली आहे.''[2]

(3) प्रीती सदावर्ते – ''स्त्रीयांच्या एकूणच जीवनाविषयी समाजापुढे निर्माण झालेले प्रश्न–उपप्रश्नांची सांगोपांग चर्चा ''[3]

**(4) माया पंडित –** ''कोणत्याही समाजामध्ये काही विशिष्ट संरचनामुळे, संकल्पनांमुळे, काही विशिष्ट कल्पनाप्रणलींमुळे, काही विशिष्ट व्यवहारामुळे अन्याय होत असतो आणि त्या अन्यायाच्या विरूध्द झगडण्याची भूमिका घेऊन उभे राहणे म्हणजे स्त्रीवाद.''[4]

**(5) डॉ. सीमा साखरे –** ''स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या शेषणाबद्दल अत्याचारांबद्दल समाजात, कुटुंबात कामाच्या जागी जागृती निर्माण करणे आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी स्त्री–पुरूषांनी जाणीवपूर्वक विचार आणि कृती करणे म्हणजे स्त्रीवाद होय.'' [5]

एकूणच स्त्रियांचे अधिकार, हक्क, कर्तव्य, बदलत सामाजिक संदर्भ, प्रश्न, योजना, उपाय, पुरूषप्रधान व्यवस्थेशी असलेला संदर्भ या गोष्टी परस्परावलंबी व एकमेकांवर परिणाम करणाऱ्या असल्यामुळे स्त्रीवादी प्रणालीच्या मूळ गाभ्यामध्ये सतत बदल होताना दिसून येतो. स्त्री–पुरूष समानतेस पोषक ठरणाऱ्या स्त्रीवादी विचारसरणीमध्ये सातत्याने नवनवीन भर पडत असल्याने, त्यानुसार स्त्रीवादाच्या व्याख्येमध्ये बदल होताना दिसून येतो. म्हणूनच स्त्रीवादाची एकच एक व्याख्या करणे कठीण असून त्यामध्ये वैविध्य दिसून येते.

### स्त्रीवादाचे स्वरूप :

स्त्रीवादाच्या व्याख्येमध्ये वैविध्य असल्याने स्त्रीवादाचे स्वरूपदेखील व्यापक झाल्याचे दिसून येते. प्रथमतः 'स्त्रीवाद' हे नाव संबोधले गेल्याचा उल्लेख 'स्त्री जीवनाची गुंतागुंत' या पुस्तकात केलेली दिसून येतो. ''स्त्रीवाद सभोवतालच्या परिस्थितीचे विश्लेषण करायला शिकवितो, स्त्रीला स्वतःच्या हक्काची, स्वातंत्र्याची, न्यायाची जाणीव करून देतो. ही बंधने तोडण्याची ताकद देतो. संघर्ष करायला शिकवितो. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या अंतमनात दबलेल्या उर्मी आहेत, आकांक्षा आहेत.''[6]

पुरूषप्रधान व्यवस्थेत होणाऱ्या आपल्या शोषणाची जाणीव स्त्रीला अनेक शतकांपासून कमी अधिक प्रमाणात होती, परंतु आधुनिक कालखंडात ही जाणीव तीव्रपणे होऊ लागली. त्यामुळे प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द बंड करून त्या जाणिवेचा आविष्कार ती आपल्या कृतीतून, वाणीतून व लेखणीतून प्रभावीपणे करू लागली. अशारीतीने स्त्रीवाद ही संकल्पना स्त्रीच्या अस्मितेच्या लढ्यातून उत्क्रांत झाली. समाजव्यवस्थेचे केंद्रस्थान असणाऱ्या पुरूषाप्रमाणेच स्त्रीलाही समाजरचनेत 'अर्थपूर्ण स्थान' प्राप्त व्हावे यासाठी संघर्षशील राहणारी ही विचारधारा आहे. "The Female is a female by virtue of a certain lack of qualities." या ॲरिस्टॉटलपासून चालत आलेल्या अभावात्मक विचारसरणीला नकार देणे, स्त्रीही 'अपूर्ण मानव' ही समजूत नष्ट करणे, स्त्री विषयक नवीन मानदंड निर्माण करणे. या भूमिकेतून स्त्रीवादाच्या कार्याची दिशा निश्चित झाल्याचे दिसते. या संदर्भात मंगला वरखेडे म्हणतात की, ''धर्मसंस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकीयसंस्था, शिक्षणसंस्था यांच्या संस्थात्मक बांधणीतला पुरूषसत्ताक मतलबीपण उघड करणे, रूढी–परंपरा, कायदा, तत्वज्ञान, सौंदर्यविचार, भाषा यातील पुरूषसत्ताक मूल्यांना प्रश्नांकित करणे आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील आचार विचारांत दिसणारी स्त्री पुरुष विसंगतीतील विसंगती उघड करीत नवसमान निर्मितीच्या विविध पर्यायाचा शोध घेणे हे स्त्रीवादी तत्वज्ञानाचे स्वरूप आहे.''

बदलते समाजजीवन, विज्ञानयुगाचा उदय, शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास यामुळे आपल्या दुर्बल, पराधीन आयुष्याची जाणीव होत गेल्याने स्त्रिया आपल्या आवाज उंचावू लागल्या. स्त्रीने डोळे उघडून जगाकडे पहायला सुरूवात केल्यावर तिला मुख्य प्रवाहापासून फेकलो गेल्याची जाणीव झाली, तेव्हा आपल्या अस्तित्वासाठी पाय रोवायला तिने संपूर्ण सामर्थ्यानिशी सुरूवात केली. स्त्रीच्या अधःपतनाचे पुरूषी राजकारण तिला समजू लागले. त्यावेळी स्त्रीला या दुय्यम स्थानावरून केंद्रस्थानी आणणे हे स्त्रीवादाचे मुख्य उद्दिष्ट व प्रस्थापित पुरूषी राजकारणाला छेद देणे हे कार्य बनले.

स्त्रीवादाच्या वरील सर्व व्याख्यांचे व स्वरूपांचे परिशीतल करता लक्षात येते की स्त्रीवाद ही स्त्रियांना माणूसपणाचा मूल्ययुक्त हक्क प्राप्त करून देण्यासाठी वचनबध्द असणारी विचारधारा आहे. जीवनाचा सर्व क्षेत्रांमध्ये होणारे स्त्रीशोषण व दुय्यम स्थान नष्ट करणे हे तिचे पायाभूत उद्दिष्ट आहे. समाजातील शोषणप्रवृत्तींना छेद दिल्यावर स्त्रीवादाचा समाजातील इतर दुर्बल घटकांशी संवाद साधला जाईल आणि या संवादातूनच समताधिष्टित नवसमाजनिर्मितीचे स्वप्न लवकरात लवकर साकार होईल.

### स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप, कार्य, उद्दिष्टे :

शतकानुशतकाच्या लिंगभेदात्मक अनुभवविश्वातून आकारास आलेला स्त्रीवाद साहित्य समीक्षाक्षेत्रात 1960 पासून सादृश्य रूपात अवतरला जीवनाच्या सर्व महत्वाच्या स्तरावर चाललेली स्त्रीची गळचेपी दूर करण्यासाठी स्त्रीवादाने मानवी प्रज्ञा व प्रतिभेच्या सर्व पातळ्याावर स्वतःचे निशान रोवले. साहित्यासारख्या सामाजिकदृष्ट्याा महत्त्वपूर्ण क्षेत्राामध्ये स्त्रीवादी दृष्टीकोन प्रस्थापित करण्याच्या निकडीतून पाश्चात्य स्त्रियांनी स्त्रीवादी विचारपध्दती अस्तित्वात आणली. त्या त्या कालखंडात समाजजीवनामध्ये अस्तित्वात असणाऱ्या जाणिवांचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे वाङ्मयकृतीत पडलेले दिसते त्यामुळे स्त्रीत्वाच्या अस्मितेच्या व शोषणाच्या इतिहासाचा शोध वाङ्मयकृतीतून घेण्याचा विचार मूळ धरू लागला. पुरुषनिर्मित वाङ्मयातील स्त्रीदर्शनाचे स्त्रीवादी भूमिकेतून पुनर्वाचन झाले पाहिजे. स्त्रियांचे दुर्लक्षित वाङ्मय या नव्या भूमिकेतून पुन्हा उजेडात आणले पाहिजे असा विचार अलिकडच्या काळात

रूजू लागला. या वैचारिक मंथनाची अपरिहार्य फलश्रुती म्हणून 'स्त्रीवादी समीक्षे'चा उदय झाला. स्त्रीवादाअंतर्गत विचारमंथनातून आकारास आलेल्या स्त्रीवादी समीक्षा पध्दतीला सैध्दांतिक पातळीवर ठसठशीत रूप प्राप्त झाले ते 1980 च्या दरम्यान.

संस्कृतीतील स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित करणारा स्त्री–पुरूष यातील गुणभेद विविध संस्कृतिक व्यवहारामध्ये कार्यरत आहे. तसेच तो साहित्यातही प्रतिबिंबित होताना दिसतो. या प्रवृत्तीविषयी स्त्रीवादी समीक्षेची भूमिका स्पष्ट करताना माया पंडित म्हणतात, "स्त्रियांविषयीचा पारंपरिक दृष्टिकोन जतन करणाऱ्या प्रवृत्ती कशा पध्दतीने साहित्यात जतन होतात याची मीमांसा, लेखकाची त्याबाबतची कोणती भूमिका असते व तो कोण्त्या पध्दतीने आविष्कृत होते याची समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय."

स्त्रीवादी समीक्षा हा स्त्रीवादातून निर्माण झालेला बहुआयामी असा सामर्थ्यशील वाङ्मयीन वाद आहे. लेखक, वाचक, समीक्षक यांच्यामध्ये एक वैशिष्ट्यापूर्ण जागरण आणण्यासाठी वचनबध्द असणारा हा वाद साहित्य निर्मिती, आस्वाद व समीक्षण या अत्यंत महत्वाच्या प्रक्रियांमधील भूमिकांची स्त्रीवादी दृष्टीने छाननी करतो. साहित्यातून व्यक्त झालेली पुरूषप्रधान संस्कृती, तिची आपमतलबी विचारसरणी, विषममूल्यव्यवस्था यांचा दंभस्फोट करणे, स्त्रीनिष्ठ साहित्यातील स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व, स्त्रीसंस्कृती, स्त्रीभाषा आदींचे स्वरूप पाहणे, त्याचे अर्थनिर्णय व मूल्यमापन करणे हे स्त्रीवादी समीक्षेचे ध्येय आहे.

स्त्री साहित्याची परंपरा शोधून, त्यातून अभिव्यक्त होणाऱ्या तिच्या आत्मप्रतिष्ठेच्या जाणिवांची दखल घेऊन त्याचे आजच्या स्त्रीमुक्ती जाणिवांशी नाते जोडण्याचे कार्य स्त्रीवादी समीक्षा करते. पुरूषमूल्य दृष्टीतून आलेल्या रचनाबंधाना, विचारव्यूहांना छेद देते. वाङ्मयाचे पुरूषकेंद्री मानदंड, प्रमाणके यांचे पुनर्मूल्यांकन करून नवे मानदंड, नवी मूल्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करते. स्त्रीवादी समीक्षा पुरूषांच्या साहित्यातील स्त्रीचित्रणातून व्यक्त होणाऱ्या पुरूषी दृष्टिकोणाचा व स्त्रीविषयक तिरस्काराचा शोध घेते. पुरूषप्रधान व्यवस्थेने शतकानुशतकापासून घडवलेली स्त्रीची प्रतिमा, स्त्रीविषयक मूल्ये, स्त्रीत्वाचे ठरावीक नमुने साहित्यातून कसे शब्दांकित होतात याचा अभ्यास करते. पुरूषाच्या साहित्यातून प्रकटणाऱ्या स्त्रीप्रतिमा तपासून पुरूषी वर्चस्व स्पष्ट करणाऱ्या व स्त्रियांविषयी चुकीची धारणा धारण करणाऱ्या दृष्टिकोनाची छाननी करते. स्त्रीचे जीवनानुभव हा तिचे मन, तिला घडविणारी परिस्थिती, तिचे वय, लिग, सामाजिक निर्बंध या सर्वांशी निगडीत असतो. स्त्रियांच्या साहित्यातून हा अनुभव कसा व्यक्त होतो याची तपासणी स्त्रीवादी समीक्षा करते. स्त्रीवादी समीक्षेचे कार्य स्पष्ट करताना माया पंडित म्हणतात, "साहित्यसमीक्षा या सांस्कृतिक व्यवहारातून आजतागायत अदृश्य मानण्यात/समजण्यात आलेला विश्लेषणात्मक दृष्टिकोन उघड करणे आणि स्त्री व पुरूष संकल्पनेची सांस्कृतिक जडणघडण साहित्यातून कशा पध्दतीने दर्शविली व घ्डविली जाते याची मीमांसा करणे हे स्त्रीवादी समीक्षेचे कार्य आहे." एकंदरीत साहित्यातील स्त्री प्रतिमातील एकांगीपण अधोरेखित करून, पुरूषप्रधान दृष्टीला छेद देऊन साहित्यिकाला अधिक सजग बनविण्याची, प्रस्थापित संकल्पनांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी साहाय्यभूत होणारी ही समीक्षा पध्दती आहे.

साहित्याभ्यास पारंपारित पध्दतीने न होता स्त्रीवादी आत्मभानातून, अस्मितेतून, स्वत्वाच्या जाणिवेतून निर्माण झालेल्या दृष्टिकोणातून साहित्यातील प्रतिमांचा व एकूणच साहित्याचा अभ्यास व्हावा या हेतूने स्त्रीवादी समीक्षा कार्यरत असल्याचे दिसून येते. स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थन आणि गुलामगिरी हा प्रस्थापित सत्ताकारणाचा परिणाम आहे. त्यामुळे स्त्रीबाबतच्या तथकथीत संकल्पनांमध्ये अडकून स्त्रीप्रतिभेचे चित्रण न करता एक 'व्यक्ती' म्हणून स्त्रीप्रतिमेचे रेखाटन व्हावे अशी अपेक्षा स्त्रीवादी समीक्षा करते. स्त्रीत्वशोध हे या समीक्षेचे महत्वाचे उद्दिष्टे आहे. पुरूषप्रणीत जीवनादर्श नाकारताना पुरूषप्रणीत सौंदर्यशास्त्रही नाकारून समीक्षा विचारांची नवी मांडणी स्त्रीवादी समीक्षेने केली. स्त्रीवादी समीक्षेचे साहित्यातील स्त्री चित्रणाकडे स्त्रीच्या दृष्टिकोणातून बघण्याची नवी दृष्टी दिली. पुरूषप्रधान व्यवस्थेतील सर्व पातळयांवरचे हक्क मिळविण्यासाठी झालेल्या स्त्री चळवळीतील अस्तित्व शोधाच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय.

अशाप्रकारे प्रस्तुत शोधनिबंधातून 'स्त्रीवादी समीक्षेचे' बदलते आयाम स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या अनुषंगाने स्त्रीवादाची संकल्पना व स्त्रीवादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. स्त्रीवादी समीक्षेची चळवळ निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरलेली पार्श्वभूमी म्हणजे त्याकाळात लेखिकाच्या साहित्याकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यांनी निर्माण केलेले साहित्य प्रकाशित केले जात नव्हते. स्त्रियांच्या साहित्यावर अनेक आक्षेप घेतले जात होते, टीका केल्या जात होत्या यातूनच स्त्रीवादी समीक्षेचा उदय झालेला आपणांस दिसून येतो.

## निष्कर्ष :–

(1) कला, कायदा, रूढी, संस्था आणि लोकमत या सर्व स्तरांवर स्त्रियांना माणूसपणाचा मूल्यमुक्त हक्क प्राप्त होण्यासाठी जाणिवपूर्वक दिली जाणारी लढाई म्हणजे 'स्त्रीवाद' होय.

(2) युरोपीय देशात 'स्त्रीवादा'स सुरूवात झाली. इंग्रजी लेखिका व्हर्जिनिया वूल्फ आणि फ्रेंच लेखिका सिमॉन न बोव्हा या दोघींनी स्त्रीवादी विचाराच्या पाया घातला.

(3) भारतामध्ये स्त्रीवादाने 1975 पासून चांगलाच जोर धरला. स्त्रीवादाचा या काळात सर्वत्र प्रसार होऊन स्त्रियांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास निर्माण होऊन सर्व स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी लढा दिला.

(4) "वाङ्मयीन कलाकृतीकडे पाहण्याचा स्त्रीकेंद्री दृष्टिकोन आणि समाजातील रूढ पितृसत्ताक पध्दतीला वाङ्मयीन समीक्षेच्या माध्यमातून दिलेला धक्का" म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय.

(5) स्त्रियांच्या साहित्याचे अचूक मूल्यमापन स्त्रीवादी भूमिकेतून करणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय.

## संदर्भग्रंथ सूची :–


१. पाटील (डॉ.) शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, पृ. 93, 94.
२. वरखेडे मंगला, स्त्रीवाद, पृ. 64
३. सदावर्ते प्रीती, स्त्रीवाद (संपा.) सुमती लांडे, पृ. 62
४. पंडित माया, स्त्रीवाद (संपा.) सुमती लांडे, पृ. 83.
५. सीमा (डॉ.) साखरे, स्त्रीवाद, पृ. 14.
६. भागवत विद्युत (संपा.), स्त्री जीवनाची गुंतागुंत पृ. 15
७. Bevoir, Simone Ede, 'The Second Sex' London Pan Book Ltd., 1988 Page 15-16.
८. वरखेडे मंगला, स्त्रीवाद, समीक्षेतील नव्या संकल्पना जाधव मनोहर (संपा.) स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. 2001, पृ. 124.
९. पंडित माया, पाश्चात्य स्त्रीवादी समीक्षा, "प्रतिष्ठान", जुलै–ऑक्टो. 1994, पृ. 51
१०. तत्रैव, पृ. 49